
Azadi Ka Amrit Mahotsav
मत्स्यव्यवसाय विभाग
महाराष्ट्र शासन
NFDB
G20
मिळवा आपले
किसान क्रेडिड कार्ड
पात्र मत्स्य शेतकरी अर्ज करुन या सुविधेचा लाभ घेऊ शकतात.
स्थानिक मत्स्यव्यवसाय अधिकारी/कार्यालय
जवळच्या बँकेच्या शाखा

# महाराष्ट्राचा राज्य मासा

## पॅम्पस आर्जेन्टियस / सिल्व्हर पॉमफ्रेट
*(Pampus argenteus)* *(Silver Pomfret)*

**Kingdom:** Animalia
**Phylum** : Chordata
**Class** : Actinopterygii
**Order** : Scombriformes
**Family** : Stromateidae
**Genus** : Pampus
**Species** : *P.argenteus*



- पॅम्पस आर्जेन्टियस *(Pampus argenteus)* सिल्व्हर पॉमफ्रेट *(Silver Pomfret)* ही प्रजाती इंडो-वेस्ट पॅसिफिक, आशिया आणि पुर्व आफ्रिकेच्या किनारपट्टीतील क्षेत्रात आढळते.


- महाराष्ट्राच्या किनारपट्टीवरील पर्यावरण आणि मासेमारी अर्थव्यवस्थेत "सिल्वर पॉमफ्रेट (पापलेट)" या माशाला विशेष स्थान आहे.

- मासेमारी पध्दतीतील बदलांमुळे लहान पापलेट माश्यांची मासेमारी मोठ्या प्रमाणात होत असल्याने, महाराष्ट्रात सिल्वर पॉमफ्रेट(पापलेट) चे उत्पादन कमी होत आहे.

- महाराष्ट्र राज्यातील सिल्वर पॉमफ्रेटच्या

# डायमंड आसाचे कॉड एंड व चौरस आसाचे कॉड एंड





| डायमंड आसाचे कॉड एंड | चौरस आसाचे कॉड एंड |
|---|---|
| ट्रॉल जाळयाचा खोल (कॉड एंड), मासेमारी करताना दोरीच्या सहाय्याने खेचले जाऊन जाळीचे आस आकुंचन पावते. | ट्रॉल जाळयाचा खोल (कॉड एंड), मासेमारी करताना दोरीच्या सहाय्याने खेचल्या नंतरही मुळ जाळीच्या आसाचा आकार कायम राहतो. |
| ट्रॉल जाळीचा आस आकुंचन पावल्याने जाळीत अडकलेला मत्स्यसाठा खेचण्याकरीता अधिक शक्तीची आवश्यकता भासते. | ट्रॉल जाळीच्या आसाचा मुळ आकार कायम राहिल्याने जाळी खेचण्यास कमी शक्तीची आवश्यकता भासते. |
| ट्रॉल जाळीच्या खोलाची आस आकुंचन पावल्याने माशांची पिल्ले जाळयात अडकुन राहतात. | ट्रॉल जाळीच्या खोलाच्या आसाचा मुळ आकार कायम राहिल्याने माशांची पिल्ले सहज जाळी बाहेर निघुन जातात. |
| ट्रॉल जाळीच्या खोलात अधिक बायकॅच जमा झाल्याने मत्स्यसाठा साफ करणे / वर्गिकरण करण्यास अधिक कालावधी लागतो. | ट्रॉल जाळीच्या खोलात बायकॅच कमी आल्याने मत्स्यसाठा साफ करणे / वर्गिकरण करण्यास कमी कालावधी लागतो. |

# V- Form (व्ही- फॉर्म) डबल स्लॉटेड ऑटर बोड






- ट्रॉलिंग ही एक उच्च ऊर्जा केंद्रित मासेमारी पध्दत आहे आणि भारतात फक्त मध्यम आणि मोठया श्रेणीतील ट्रॉलरदवारे सुमारे १६५.२ दशलक्ष लिटर डिझेलचा वापर केला जातो. ट्रॉलर्सकरिता इंधनाचा वापर कमी करण्यासाठी भा.कृ.अ.प. - केंद्रीय मात्स्यिकी प्रौद्योगिक संस्था/ ICAR - Central Institute of Fisheries Techonology (CIFT) ने UHMWPE ट्रॉल, कटवे टॉप बेली ट्रॉली आणि शॉर्ट बॉडी कोळंबी ट्रॉल यासारख्या कमी ड्रॅग असण्याच्या ट्रॉलच्या काही डिझाइन्स विकसित केल्या आहेत.
- ट्रॉल नेटच्या क्षैतिज उघडण्याकरीता ओटर बोर्डची एक जोडी (ट्रॉल दरवाजे) आवश्यक आहे. ट्रॉल प्रणालीमध्ये सुमारे २०% ट्रॉल ड्रॅग (हायड्रोडायनामिक प्रतिरोध) ओटर बोर्डद्वारे योगदान दिले जाते. स्लॉटेड ऑटर बोर्ड हे बोर्डमधील ओपनिंमधून पाण्याच्या प्रवाहामुळे कमी ड्रॅगसाठी ओळखले जातात. ड्रॅग आणि इंधनाचा वापार कमी करण्यासाठी भा.कृ.अ.प. - केंद्रीय मात्स्यिकी प्रौद्योगिक संस्था (CIFT) ने अलीकडेच एक नाविन्यपूर्ण V- Form (व्ही- फॉर्म) डबल स्लॉटेड ऑटर बोर्ड विकसीत केला आहे.
- भा.कृ.अ.प. - केंद्रीय मात्स्यिकी प्रौद्योगिक संस्था (CIFT) संशोधन नौका आणि व्यावसायिक जहाजांवर केलेल्या प्रयोगातून असे दिसून आले आहे की ट्रॉलिंगच्या एका तासाला, त्याच आकारमानाच्या सध्याच्या बोर्डांच्या तुलनेत समुद्राच्या परिस्थितीनुसार २-३ लीटर डिझेलची बचत करता येते. केरळ, तामिळनाडू आणि कर्नाटकमधील